ebook

ई साहित्य प्रतिष्ठान

# 'शहनाईनवाज़' - उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेब

लेखक - डॉ. अनंत पावसकर



‘ई-साहित्य प्रतिष्ठान’

सादर करीत आहे.

डॉ. अनंत पावसकर

लिखित

# ‘शहनाईनवाज़’
# - उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेब



© - डॉ. अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार आणि संगीत संयोजक)

anantpavaskar@gmail.com ९८२००२२४१७

**हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!**

**फक्त ‘एकच’ क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर**

**For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on**

**https://www.esahity.com**

## ♥ लेखकाविषयी थोडेसे : ♥

**डॉ. अनंत पावसकर,** (ज्येष्ठ सिने पत्रकार आणि माजी ध्वनिमुद्रण अधिकारी) (जन्म. १२ नोव्हेंबर १९५९ मुंबई)

डॉ. अनंत पावसकर, हे खऱ्या अर्थाने हिंदी-मराठी गाण्यांमध्ये आकंठ बुडालेले व्यक्तिमत्त्व. ज्यावेळी एखाद्या गाण्याचे, त्याच्या शब्दसुरांचे, संगीताचे, गायकीचे, गाण्याच्या पार्श्वभूमीचे, ध्वनिमुद्रणाचे, गायक-गायिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना भावलेले सौंदर्य ते उलगडून दाखवतात त्यावेळी त्या गाण्यात दडलेल्या सौंदर्याच्या अनुभूतीचा आस्वाद रसिकांनाही नव्याने भावतो. १९९४ ते २०००.. प्रत्येक शनिवारी (सलग सात वर्षे) दै. सामनाच्या फुलोरा पुरवणीमधील आठवणीतली गाणी या लोकप्रिय सदरामुळे वाचकांच्या परिचयाचं एक नाव. आज दिनांक, साप्ताहिक श्री, वृत्तमानस, लोकप्रभा, उत्सव पुरवणी अशा अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिकात संगीत विषयक लिखाण करणारे अनंत पावसकर हे व्हीनस या मातब्बर म्युझिक कंपनीत अनेक वर्षे ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत होते. या काळात कंपनीतर्फे व कंपनीच्या शेकडो अल्बममध्ये त्यांचा पर्यवेक्षक म्हणून सहभाग राहीला आहे. कंपनीच्या अद्ययावत स्टुडिओत विविध निर्मात्यांच्या व संगीतकारांच्या शेकडो हिंदी चित्रपटाची गाणी, पार्श्वसंगीत होताना पाहायचं भाग्य लाभलं, परिचय झाला हे विशेष! ज्येष्ठ वादक, संयोजक यांच्यासोबत गप्पाच्या ओघात एकेक गाण्याची आठवण दृग्गोचर होऊ लागताच यातूनच ते आठवणीतली गाणी हे सदर लिहायला उद्युक्त झाले. (बाळासाहेब ठाकरे यांच्या निवासस्थानी पुस्तकांचे प्रकाशन झाले व अनेक वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती.) आपल्या कव्हर स्टोरींसाठी ते ज्येष्ठ गायक, गायिका यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेत असत. सुमारे चौदा वर्षे संगीतक्षेत्रापासून दूर असणा-या सुमनताई कल्याणपूर यांची मुलाखत घेत "ते सूर ऐकता" (संगीत : शांक-नील) द्वारे त्यांना संगीत क्षेत्रात

पुन्हा एकदा लाईम-लाईट मध्ये आणण्याचं श्रेय त्यांच्याकडे जातं. (कवि प्रा. प्रवीण दवणे यांच्याकडे खूप आठवणी आहेत).

इतर अनेक दिवाळी अंकात संगीतविषयक लिखाण करताना, ऑडिओ कॅसेट स्वरूपातही दिवाळी अंक असावा.. ही संकल्पना "गुलमोहर" नावाने प्रत्यक्षात आली. (निवेदन प्रदीपजी भिडे). व्हीनसतर्फे अनेक मराठी नाटके प्रथम व्हीसीडीवर आणण्याचं श्रेय डॉ. अनंत पावसकरांकडे जातं. यात विजय कदम, विनय लाड, सविता मालपेकर, प्रशांत दामले या बालमित्रांची विशेष मदत झाली होती. साईबाबांच्या शिर्डीत १९९९ पासून २००७ पर्यंत ऑडिओ, व्हिडिओ असे सुमारे २५० अल्बम्स बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. हे अल्बम आजही सुप्रसिद्ध आहेत.

मराठीतील पहिलं "ई-बुक" बनविण्याचा मान त्यांच्याकडे जातो. यासाठी त्यांना ज्येष्ठ साहित्यिक शिरीष कणेकरजी यांच्या उपस्थितीत "आशीर्वाद" पुरस्काराने गौरविण्यात आले होते. तसेच नुकतेच त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. "डॉक्टरेट" सुद्धा मिळाली! आज त्यांची आठवणीतली गाणी, आपली आवड, लिजेंडस् ७७७७, कराओके क्लब या सह इतर अनेक ई-बुक्स सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत हे विशेष. आज आपल्या समाधानी निवृत्त जीवनात ते "म्युझिक प्लॅनेट" ही स्वतःची संगीत अकादमी समर्थपणे सांभाळत आहेत. आपल्या सारखाच एक सर्वसामान्य रसिक, आपल्या संगीताचं वेड लेखनातून तसेच विविध संकल्पना राबवून लोकांपुढे आणायची सतत धडपड करतो म्हणून हा उल्लेख.

डॉ. अनंत पावसकर यांना हार्दिक शुभेच्छा.

(#संजीव_वेलणकर पुणे. - ९४२२३०१७३३)

♥

# ‘शहनाईनवाज’ उस्ताद बिस्मिल्लाह खाँ

★ लेखक : अनंत पावसकर




मंगळवार दि.२२ ऑगस्ट, २००६ रोजीच्या वर्तमानपत्रात आलेली ती बातमीच मन सुन्न करणारी होती. ऑफिससाठी निघण्याआधी बातम्यांचं ‘चॅनल’ बघूया म्हणून थरथरत्या हातांनीच ‘टी.व्ही’ लावून पाहतोय तो काय! ‘ब्रेकिंग-न्यूज’ म्हणून तीच बातमी सर्व ‘चॅनल्स’वर सुरू होती. ‘शहनाईनवाज़ उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेब काळाच्या पडद्याआड!!’ मूक झाली ‘शहनाई’! शहनाईचा ‘शहेनशाह’ गेला! निरागस व्यक्तिमत्त्वाच्या त्या थोर कलावंताचा चेहरा डोळयांसमोर क्षणार्धात तरळून गेला. ध्वनिमुद्रणाच्या निमित्ताने त्यांच्या सहवासात

घालवलेले ते दिवस आठवू लागले. आत्यंतिक जिव्हाळा निर्माण झालेले ते उस्तादजी, पैगंबरवासी व्हावेत याचं अतिशय दुःख वाटत होतं.

शहनाई-सनई काही दुर्मीळ वाद्य नाहीय. ते वाजविण्यास सहज सोपे सुद्धा नाहीय तरीही महाराष्ट्रातच नव्हे तर अवघ्या हिन्दुस्थानी सांस्कृतिक परंपरेत तिचं स्थान अग्रभागी आहे, हे आपण जाणताच! स्वागत, आनंद, उत्सव अशा प्रत्येक क्षणी तिची साथसंगत आपल्याला होत असते. ती आपल्याला अतिपरिचित असल्यानेच की काय, आपल्याला तिचं अप्रूप वाटत नाही, आणि ते वाद्य तसं ग्रेट नाही, असाच आपला समज आहे. पण.. 'सनई-शहनाई' या शब्दाच्या नुसत्या उच्चारासरशी आपल्याला आठवतं ते 'शहनाईनवाज़ उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांचं' अत्यंत प्रतिष्ठित असं 'वलयांकित' नाव! आणि त्यांचं ते अवीट गोडीचं 'शहनाईवादन'!

नुसतीव मंगल-धून आळवणारी ही सनई 'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांनी' आपलीशी करताच तिला शास्त्रीय संगीताचे जणू वेध लागले... आणि ती शास्त्रीय संगीताच्या दिग्गज प्रभावळीत सन्मानानं अधिष्ठित झाली. गेली सात दशके केवळ स्वतःच्या ताकदीवर या शहनाईला, शास्त्रीय संगीताच्या मुख्य अशा देदीप्यमान प्रवाहात आणून तिला लोकमान्यता आणि राजमान्यता मिळवून देणं सोपं नाहीय महाराजा! एकट्या 'बिस्मिल्ला खाँसाहेबांचाच' भूतकाळ जाणून घ्यायचा, तर थेट शंभर वर्षे मागे जाऊन इतिहासाची पानं चाळावी लागतील! काही पुस्तकं मिळाली, तर आमच्या 'म्युझिक-इंडस्ट्री' मधील काही अगदी काही हुकमी एक्क्यांशी

दिलखुलास गप्पा मारल्या. त्यातून जे काही माझ्या दृष्टीक्षेपात आलं ते थक्क करणारं होतं, एवढं मात्र नक्की!

'भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांची' संपूर्ण 'जीवनगाथा' (त्यांच्या व्यक्तिगत माहितीसह) विषद करण्याआधी आपण त्यांच्या 'सनई-शहनाई', या वाद्याविषयीची थोडीशी खोलात जाऊन माहिती घेऊया! कारण प्रत्येक रसिक, वाचक, त्या त्या अमुक दिग्गजांविषयी उत्सुकता असल्यानेच 'ई-बुक' वाचत असतो! त्याला प्रत्येक वाद्याची माहिती असेलच, असं कधीच नसतं! (एखाद्या सर्वसामान्य वाचक किंवा रसिकासमोर, एखादा वादक जेव्हा मी 'बगलबच्चा' वाजवतो! किंवा मी 'मरिंबा' वाजवतो! असं म्हणताच, समोरचा 'ब्लँक' होतोच, ना!! कारण जगातील सर्वच्या सर्व संगीत वाद्यांची परिपूर्ण अशी माहिती कुणालाच नसते! हेच काय! ती अनेकदा, सध्या प्रचलित झालेल्या 'गुगल' वर तर नसतेच नसते! 'काय सांगशील ज्ञानदा?' असा प्रश्न जर तुम्ही विचारलात, तरी काहीही पदरात पडणार नसतं! म्हणून ही माझी तडफड आहे! हा खटाटोप! धडपड!) कृपया या गोष्टीला, मराठी म्हणींप्रमाणे 'नमनाला घडाभर तेल!..' अशी दुषणे देऊ नका किंवा 'वडयाचं तेल वांग्यावर..' काढतात तसा, माझा राग राग करू नका! माझी मानसिकता विचाराल तर.. एखादा वाचक, आपल्या आवडीच्या कलावंताबद्दलचं, ते अमुक 'ई-बुक' वाचताना.. त्यांच्या भावभावना या केवळ 'त्या' ई-बुकमधील 'कलावंताच्या' एकंदर जिवनशैलीविषयी आतुरलेल्या असतात! आपण, त्या सन्माननीय दिग्गजांविषयी केवळ 'गुगलवर' उपलब्ध असलेली

माहिती देऊन उगीचच पाने का म्हणून भरायची?.. ‘दुधाची तहान ताकावर..’ मी का म्हणून भागवायची?’.. तसंच ‘अर्ध्या हळकुंडाने पिवळं होत, का म्हणून रसिकांना संभ्रमात ठेवायचं? ‘कन्फ्युज’ करायचं! किंवा जे लोकांना ‘ऑलरेडी’ माहीत आहे, तेच ते.. पुनःपुन्हा सध्याच्या ‘न्यूज-चॅनल’ वर सांगतात तसं आपलं ज्ञान पाजळून, ‘खुंटी घट्ट करावी..’ तद्वत, विनाकारण स्पष्टीकरण देत, ‘शिळया कढीला, का म्हणून ऊत आणायचा..?’ तर..! तर! मित्रांनो! अपना तो उसूल है! ‘जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे, शहाणे करून सोडावे सकल जन..’ या संत रामदासजींच्या उक्तीप्रमाणे, माझ्यासारख्या नवख्या लेखकांनी वागायलाचं हवं! हे माझ्यासाठी तरी महत्त्वाचं! असो! आपण या ‘शहनाई’ बद्दल जाणून घेऊया! ‘सनई-शहनाई’ या नावाने प्रचलित असलेलं हे तोंडाने फुंकून वाजविण्याचं वाद्य, भारतातील एक पारंपरिक सुषिर वाद्य आहे. आपल्या श्वासांवर नियंत्रण करत तोंडाने फुंकून वाजविण्याच्या (‘ब्लोविंग’) वाद्य-गटातलं एक वाद्य! ‘मंगलवाद्य’ म्हणून वाजवली जाणारी ‘सनई-शहनाई’ ही तद्दन भारतीय आहे यात वादच नाही. परंतु काही फुंकून वाजवली जाणारी सनईसदृश इतर अनेक वाद्येही आहेत, हे लक्षात घ्या! अभ्यासा! त्यांना ‘झुर्ना’, ‘नाई’ अशी पर्यायी नावे आहेत तर दक्षिण भारतातलं ‘नादस्वरम्’ आणि शहनाईच्याच छोटया रूपातली ‘सुंदरी’ ही वाद्येही याच सनई प्रकारातली! ‘विंड इन्स्ट्रुमेंट’ अर्थात फुंकून वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांबद्दल सांगायचं तर यात ‘रेझोनेटर’ (‘टयुब’ सारखं!) हा मुख्य घटक असतो. वरच्या बाजूला ‘माऊथपीस’ तर दुसऱ्या बाजूला त्यातून निर्माण झालेला ध्वनी

वाजतो! ही सर्व वाद्ये, दोन कुटुंबात विभागली गेली आहेत. ‘फुंकून’ वाजवली जाणारी ‘बासरी’, ‘इंग्लिश-फ्यूट’, ‘शहनाई’, ‘सुंदरी’, ‘ओबो’ व ‘बासून’ ही ही वाद्ये! तर ‘पितळी’ वाद्ये ‘ट्रम्पेट’, ‘ फ्रेंच-हॉर्न’, ‘ट्रॉम्बोन’ व ‘टयुबा’ अशा वाद्यांचा अंतर्भाव असतो! (उल्लेखलेली बहुतांश वाद्ये, मला पहायला/ऐकायला मिळाली, हे माझं सुदैव!) ‘सॅक्सोफोन’ हे भले ‘वुड-विंड’ प्रकारातलं मानलं जातं, परंतु ते पितळेचे असते. या ‘सॅक्सोफोन’च्या फॅमिलीत ‘सोप्रानिनो’, ‘सोप्रानो’, ‘आल्टो’, ‘टेनर’, ‘बॅरिटोन’ आणि ‘बास’ यांचा अंतर्भाव असतो! ‘पियानिका/मेलोडिका’ (‘पियानो’ सदृश!) सुद्धा फुंकून वाजवतात. (‘शिवानी, हे खरंय का?!’ तर होय..!) कारण ही सविस्तर ‘ऑथेंटिक’ अशी विश्वासार्ह माहिती, मला आमच्या ‘म्युझिक-इंडस्ट्रीतील’ प्रख्यात सॅक्सोफोन वादक आणि पंचमदांचे जिनियस




संगीत संयोजक असलेल्या ‘मनोहारी दादा’ (मनोहारी सिंह) यांनी आपलेपणाने दिली होती. (आता या क्षणी आपल्या सुदैवाने ‘गुगल’ वर, अनेकाविध वाद्यांबद्दलची

साग्रसंगीत माहिती उपलब्ध झालीय यार! तर ती उपलब्ध झालेली माहिती, मी इथे एक खास ‘प्ले-लिस्ट’ बनवून इथे देतोय! अभ्यासकांनी नक्कीच ती पहा! ही विनंती!) तर ज्येष्ठ व सुप्रसिद्ध शहनाई वादक ‘मधुकर धुमाळ’ (शहनाई) व ‘गजानन साळुंके’ (सुंदरी) यांच्यासोबतच्या गप्पांमधून, ‘शहनाई’ आणि सन्माननीय ‘बिस्मिल्लाजीं’ सह इतर सर्व शहनाईवादकांबद्दल बरीचशी माहिती मिळाली. त्यांनी त्यांना ज्ञात असलेली माहिती आपलेपणाने दिली खरी.. पण त्यातून तितकंसं समाधान होणं शक्य नव्हतं. केवळ आपलं कर्तव्य मानून, यावर ‘ग्रंथ’ उपलब्ध आहेत का? याचा मी शोध सुरू केला. पण कसचं काय? आधी पारंपरिक अभंगांवर विस्तृतपणे लिहायचं म्हणून शोध घेता ‘सकल संत गाथा’ या ग्रंथाचे दोन भाग आहेत असं ‘आयडियल बुक डेपो - दादर’ मुळे समजलं होतं! परंतु त्यांच्या हजाराच्या घरातल्या किंमती ऐकून मी जागच्या जागी थिजलो होतो ना! तसंच आताही झालं! ‘फुंकून वाजवल्या जाणाऱ्या’ वाद्यांबद्दल काही ग्रंथ आहेत का? मी पुन्हा ‘आयडियल’ गाठलं! यासारख्या विषयावर अनेक ग्रंथ/पुस्तके आहेत, ती घेणं भाग आहे. पण पुन्हा ‘पहिले पाढे पंचावन्न!’ तिथल्या माझ्या ओळखीच्या सेल्समनने असे ग्रंथ अत्यंत महाग असतात, हे सत्य आपलेपणाने (पण तोंडावर) सांगितलं. हे आपल्या आवाक्या पलिकडचे असल्याचं लक्षात येताच, मुग गिळून गप्प बसण्याशिवाय पर्याय नव्हता! (मी एक सर्वसामान्य लेखक! माझं ‘बजेट’ नव्हतं हो!) ‘शंख’ वगळता सर्वच वाद्यांबद्दल आपण तसे अनभिज्ञच! नाही का? काही ज्येष्ठ अभ्यासक, साहित्यिकांच्या लेखांमधून मात्र बरीच माहिती मिळाली!

याप्रमाणे वाचनात आल्यानुसार.. ही 'सनई' भारतात आली ती मध्यपूर्वेतल्या मुस्लिम देशातून, विशेषतः इराण अथवा टर्की मधून! असा एक मतप्रवाह आहे! अनेक शतकांआधी इराण, टर्की या देशातून 'झुर्ना/सुर्ना' नामक वाद्य भारतात येऊन त्याचं रूपांतर पुढे प्रचलित 'सनई-शहनाई' मध्ये झाल्याचं अभ्यासक सांगतात. शहनाईची धाकटी बहिण म्हणावी अशी छोटीशी 'सुंदरी' सुद्धा याच प्रभावळीतली आहे! मी 'रेकॉर्डिंग-स्टुडिओतला' असल्याने जे अनुभवलं ते ते सांगायचं तर.. अमुक 'ब्लोविंग' वाद्यांपैकी सर्व प्रकारच्या 'फ्ल्यूटस्-बासरी', (त्यांचा आवाज काहीसा मंजुळ असल्याने,) माईकवर थेट 'रेकॉर्ड' होताना दिसल्या. मी आपली 'शहनाई-सुंदरी' माईक जवळ धरून वाजवताना पाहिलं! पण मित्रांनो, काही वाद्यांबद्दल गंमत म्हणून एक तांत्रिक बाब सांगतो. ती खचितच रंजक आहे! तोंडाने फुंकून घालून वाजविल्या जाणाऱ्या वाद्यांपैकी 'क्लॅरोनेट', 'सॅक्सोफोन', 'ओबो', 'सुप्रानो', 'टेनर-सॅक्स' ही वाद्ये शिताफीने, एका अमुक 'अँगल' मध्ये, (आणि कधी) 'सायलेन्सर' लावून माईकजवळ धरून वाजवणं वादकांना शक्य असतं! पण 'पुंगी', 'ट्रम्पेट', 'कॉर्नेट', 'ट्रम्बॉन', 'टयुबा', 'फ्लग-हॉर्न', 'फ्रेंच-हॉर्न', 'तुतारी' ही वाद्ये.. काहीशी कर्कश असल्यानेच की काय.. 'व्हेरी-सेन्सिबल माईक' वर धरून थेट वाजवत 'रेकॉर्ड' करता येत नाहीत. (नागिन (१९५४) मधल्या गाण्यांमधली ती 'पुंगी' कल्याणजीभाईंनी 'क्ला-व्हायोलिन' या 'की-बोर्ड सदृश' वाद्यावर वाजवली आहे! 'मेरी प्यारी बहनिया..' या गाण्यातलं संपूर्ण 'ब्रास-सेक्शन' चक्क वादकांना बॅण्डवाल्यांसारखं स्टुडिओच्या

बाहेर उभं करून रेकॉर्ड केलं गेलंय, हे तर सर्वांनाच माहीत आहे! सध्या ही दोनच उदाहरणे पुरेत.) या फुंकून वाजविल्या जाणाऱ्या (ब्लोविंग) वाद्यांचा एक गंमतीदार भागही आहे! 'शंख', 'शहनाई', 'फ्ल्यूटस्-बासरी', 'क्लॅरोनेट', 'रेकॉर्डर', 'तुतारी' रेकॉर्ड करत असताना.. त्या वादकांसमोर तुम्ही 'चिंचा', 'आवळे', 'काकडी' कधीच खाऊ नका! 'तोंडाला पाणी सुटतं..' या कारणास्तव ते त्यांचं वाद्य वाजवूच शकत नाहीत. ते 'रेकॉर्डिंग' बोंबललंच म्हणून समजा!




आता आपल्या मूळ विषयाकडे वळायचं तर.. 'मंगलवाद्य' म्हणून वाजवली जाणारी ही 'सनई-शहनाई' ही तद्दन भारतीय आहे, याबद्दल शंकाच नाही! परंतु त्या वाद्याचं स्थान पुरातन काळापासून आपल्या 'शास्त्रीय संगीतच्या प्रभावळीत' अधिष्ठित होतं का? किंवा एखाद्या अमुक संगीत घराण्याशी थेट संबंधित होतं का?

क्षमा असावी! याविषयी सविस्तर माहिती, मला तरी मिळालेली नाही! (ज्येष्ठ संगीत अभ्यासक, संशोधक वगैरे सन्माननीय मंडळींनी यावर नक्कीच भाष्य करावं, ही विनंती!) परंतु ते प्राचीन काळापासून उपलब्ध असावं, एवढं मात्र निश्चित! लिहिण्याच्या बोरूच्या लेखणीसारख्या आकारातील मंगलवाद्याची निर्मिती खचितच वेदपूर्व काळातली असावी, असा शहनाईवादकांचा दृढ विश्वास आहे. एक ते सव्वा फूट लांबीच्या लाकडी नळीवर स्वरांची सात छिद्रे पाडून, पुढे नर्कट (पत्तूर किंवा रीड) बसविले जाते. शहनाई ही ओठांच्या आधाराने प्रयासपूर्वक पकडून श्वासांवर नियंत्रण करीत, फुंकर मारून ती वाजवली जाते. सात शुद्ध व पाच कोमल स्वरांच्या निर्मितीचा हा खेळ सात छिद्रांमधून सहा बोटांच्या करामतीने वाजवणं तसं जिकिरीचंच! आणि कौशल्याने ते सहज वाजवता येऊ शकतं. ज्येष्ठ 'शहनाई' वादकांच्या मते, 'शहनाई' हे इतर काही फुंकून वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांइतकं तरी दमछाक करणारं वाद्य नाहीय! 'शहनाई' आणि 'तार-शहनाई' ही दोन पूर्णतः वेगवेगळी स्वतंत्र वाद्ये आहेत. यात गल्लत करू नका! 'शहनाई' ही फुंकून वाजवली जाते. तर 'तार-शहनाई' ही घर्षण करून वाजवली जाते. अगदी 'सारंगी' प्रमाणेच! पंजाबमधील 'दिलरुबा', 'इसराज', 'ताउश', 'सारंगी' ही याच वर्ग-गटातली असं म्हणता येईल! ('लिंक' पहा!). 'इसराज' व 'सारंगी' यांचा संयोग होऊन तयार झालेले वाद्य म्हणजे 'तार-शहनाई'! 'दिलरुबा', 'वीणा', 'मंदार-बहार' अशी वाद्ये लीलया वाजवणाऱ्या, कलकत्ता आकाशवाणीतील श्री. दक्षिणा मोहन टागोर (१९१५-१९८६) यांना 'इसराज' वाजवताना लक्षात आले की, हे

वाद्य खूपच नाजूक व त्याचा आवाजही फार कमी आहे. कलकत्त्यातील वाद्ये बनवणारे कारागीर एन. एन. मोंडल यांना कैफियत सांगितली. मोंडलजींनी वाद्याचा आवाज वाढवण्यासाठी त्याला 'बास-हॉर्न' लावला, 'पिन' बदलली. अनेक प्रयोगांअंती ही 'तार-शहनाई' तयार झाली! थेट हृदयाला भिडेल अशी आर्त स्वरात वाजणारी ही तार-शहनाई, 'सारंगी' वाजवण्याच्या पद्धतीप्रमाणेच वाजवली जाते, हे विशेष! ('लिंक्स्' क्लिक करा!)




ज्येष्ठ वादक मधुदादाने दिलेल्या माहितीनुसार या 'शहनाई' मध्ये असणारा मधला आधारभूत दांडा, नलिका ही बऱ्याचदा अस्सल शिसवी लाकडाने बनविलेली असते. कधी-कधी 'बर्मा टिकवूड' (बी.टी.सी.) किंवा सागाच्या लाकडाचाही सर्रास वापर केला जातो. ही सगळी करामत, खरं तर लेथ-मशिनवरचीच! आतला पोकळ भाग, घाट जितका चांगला, तशी त्याची किंमत! १९८०-९० च्या दशकात बनारसला एक आजी या कामात निष्णात होती. आता

तिचा वारसदार 'खलिदभाई' हा कारागीर दर्जेदार अशी 'शहनाई' बनवतो, तसंच सध्या 'वार्सी ब्रदर्स', 'मोहम्मद युनुस' हे सुद्धा या क्षेत्रातले मातब्बर समजले जातात, अशी माहिती मिळाली! 'शहनाई' मध्ये 'रीड' महत्त्वाची भूमिका बजावतो. अशा प्रकारच्या रीडसाठी ताडाच्या झाडाच्या काड्या वापरल्या जातात. परंतु त्यातून निर्माण होणारा ध्वनी खूपच 'लाऊड' असतो. (तानपुरा छेडणं, वाजवणं किंवा, तबला वाजवणं आणि बडवणं इतका हा फरक!) 'शहनाई' साठी अस्सल 'रीड' हवं ते बनारसचंच! गंगानदीच्या काठावर नैसर्गिकरित्या वाढणाऱ्या एका लव्हाळ-सदृश वनस्पतीतून मिळाणाऱ्या काडया या सर्वोत्तम मानल्या जातात. त्या काड्यांना काथ्याने घासून आवश्यक त्या प्रकारचं 'रीड' बनवलं जातं. अत्यंत मुलायम आणि सुखद स्पर्श असणाऱ्या या रीडस्‌मधून सनईचा मंजुळ ध्वनी निर्माण होतो. आपल्या मुंबईत पवई तलावाच्या परिसरात अशाच प्रकारची वनस्पती आहे खरी, पण ती सनईच्या रीडस्‌साठी कुचकामी ठरली. दुदैव आपलं! ती वाजवताना  चट्‌कन सुकते आणि त्यातून जॉनी वॉकरच्या स्टाईलचा चिरका ध्वनी निर्माण होतो! जत्रेतली 'पिपाणी' तसेच फुगेवाल्याकडच्या पिपाणीसाठी मात्र ती अतिशय उपयुक्त ठरली, हे मात्र नक्की!

आपल्या सन्माननीय उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांबद्दल काहीसं विस्तृतपणे सांगायचं तर या 'शहनाईचा' शंभरेक वर्षांचा इतिहास डोळयांपुढून सरकतो. बिहार मधील 'डुमराव' नावाच्या एका  छोट्याशा गावात मंगळवार, दि. २१ मार्च, १९१६ रोजी भल्या पहाटे जन्मलेले खाँसाहेब खरोखरच भाग्यवान!

आजोबा शहनाईनवाज़ 'रसूल बक्ष खाँसाहेब'! आपल्या खाँसाहेबांचं 'घराणं' हे उमराव रियासतीचे 'महाराजा केशव प्रसाद सिंह' यांच्या दरबारात मानद संगीतकार म्हणून सेवेत होतं. बिस्मिल्लांचे आजोबा 'उस्ताद रसूल बक्ष खाँसाहेब' आणि अब्बाजान 'उस्ताद पैगंबर बक्ष खाँ' हे महाराजांच्या दरबारात पहाटे 'मंगलधून' शहनाई वाजविण्यासाठी जात असत. कलासक्त 'पैगंबर बक्ष खाँ' आणि 'मिट्ठनबेगम' या आई-वडिलांचे दुसरे अपत्य असलेल्या 'बिस्मिल्ला' यांचं नाव खरंतर 'कमरूद्दीन' हेच ठेवायचं निश्चित झालं होतं, परंतु त्यांना आजोबांच्या आग्रहाखातर 'बिस्मिल्ला' हे नाव दिलं गेलं! आणि नंतर ते या नावानेच ओळखले जाऊ लागले. कसं?! तर.. ती पहाट तशी नेहमीसारखीच होती, पण ' उस्ताद रसूल बक्ष खाँसाहेब' आज वेगळयाच अशा प्रसन्न मूडमध्ये होते! आपला सुपुत्र 'उस्ताद पैगंबर खाँ' यांच्यासोबत, त्यांनी महाराजांच्या पहाटेच्या सलामीसाठी जाण्याची तयारी केली होती. महाराजांच्या रियासतीमध्ये असलेल्या 'मंदिरात' आज त्यांनी 'भूप' रागानंतर 'बसंत बहार' हा राग आळवण्याचं निश्चित केलं होतं! त्यासाठी तगडा रियाज सुद्धा केलेला होता. ते त्या सादरीकरणासाठी आपल्या साजिंद्यांसह प्रस्थान करणार इतक्यात आतल्या खोलीतून नुकत्याच जन्मलेल्या बाळाचा 'पंचम' ऐकताच पावलं थबकली! सर्वांच्या चेहऱ्यावर स्मितरेषा उमटली. त्यांना नातू झाल्याची गोड बातमी दाईनं सांगताच.. ते हरखून गेले. त्यांची सुनबाई 'मिट्ठनबेगमने' ('उस्ताद पैगंबर बक्ष खाँ' यांची सुविद्य पत्नी) पुत्ररत्नाला जन्म दिल्याची आनंदाची बातमी ऐकून त्यांच्या ओठावर शब्द उमटले ते 'बिस्मिल्ला'!

शुभारंभ!, श्रीगणेशा! (‘बिस्मिल्लाह-हिर्रहमा-निर्रहीम’ या शब्दांचा सविस्तर अर्थ सांगायचा तर.. ‘परम कृपामय, अपार दयाळू अशा, मी समर्पित असलेल्या, अल्लाहच्या नावाने.. प्रारंभ करतोय!) पैगंबर बक्ष आणि आई मिट्ठनबेगम यांनी त्या बाळाचं नाव ‘कमरूद्दीन’ ठेवायचं निश्चित केलंय हे सांगितलं, पण आजोबांनी आपल्या हट्टाने त्या बाळाचं नाव ‘बिस्मिल्ला’ हेच नाव कायम केलं! ‘बिस्मिल्ला’ हे सर्वांचेच लाडके होते, पण त्यांचा जास्त ओढा होता तो त्यांच्या मामूकडे! ‘उस्ताद अली बक्ष विलायत खाँ’ (अली बक्ष ‘विलायतु’!) या मामूंकडे तो अगदी लहानपासूनच जायचा! काशीच्या विश्वनाथ मंदिरात मानद ‘शहनाईवादक’ म्हणून सेवा देणाऱ्या या त्याच्या लाडक्या मामूबद्दल त्याला आत्यंतिक जिव्हाळा होता. प्रेम होतं! त्यांच्या कलागुणांमुळे त्यांच्याबद्दल अप्रूप वाटायचं! छोटया ‘बिस्मिल्लाच्या’ मनात ‘शहनाई’ या वाद्याबद्दलची आपुलकी, जिज्ञासा आणि वाजवण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती पाहून, मामूंनी आपल्या त्या ‘ईद’ या शुभ उत्सवी सणाचं औचित्य साधत, लाडक्या ‘बिस्मिल्ला’ या बेट्याला एक ‘शहनाई’ मनापासून भेट दिली! तर अशाप्रकारे या छोटया ‘शहनाई’ वादकाचा ‘ईद’च्या शुभमुहूर्तावर ‘बिस्मिल्ला’ झाला! यामुळे झालं काय? तर छोटा ‘बिस्मिल्ला’ आपल्या ‘शहनाई’ या वाद्याच्या ओढीनं मामूंकडेच रहायला लागला! हातात स्वर्ग गवसल्यागत ‘बिस्मिल्ला’ त्या वाद्यात रमला. म्हणतात ना! भगवान श्रीकृष्णाने आपल्या ‘बासरीवर’ जितकं प्रेम केलं असेल, तितक्याच समर्पित भावनेनं ‘बिस्मिल्लाजींनी’ आपल्या ‘शहनाईवर’ प्रेम केलं असावं, यात अतिशयोक्ती नसावी! शुभप्रसंगी वाजवल्या जाणाऱ्या या

वाद्याच्या मंजुळ स्वरांनी अवघा आसमंत क्षणार्धात मंगलमय होऊ शकतो, हे सत्य अनुभवताच 'बिस्मिल्ला' जणू तहानभूक विसरला! खरंतर खेळण्या-बागडण्याचं वय ते! पण खेळणं वगैरे तो विसरला! अली बक्ष मामूंची दिनचर्या आखीव-रेखीव असायची. पहाटे काशीचं 'विश्वनाथ मंदिर', त्यानंतर उगवत्या सूर्यनारायणाचं स्वागत व्हायचं, एक किलोमीटर अंतरावर असलेल्या, पंचगंगा घाटावरील 'वाराणसीच्या बालाजी मंदिरात'! काशीतल्या या दोन्ही मंदिरातली सलामी आटोपून स्वारी प्रसन्न मुद्रेने घरी परतायची. काही वेळानंतर घरातील त्यांच्या खास खोलीत 'रियाज' सुरू व्हायचा. लहानगा बिस्मिल्ला त्यांचं वाजवणं मंत्रमुग्धपणे ऐकायचा! दंग व्हायचा! मामू कधी 'शागीर्द' म्हणून स्वीकार करतील, या अपेक्षेने 'शहनाई' वाजवण्याचा आटापिटा करायचा. मामूंच्या चाणाक्ष नजरेने ती गोष्ट हेरली नसेल तर नवलच! आणि दुसऱ्याच दिवसापासून तो त्यांचा 'शागीर्द' झाला. सुरुवातीला 'शहनाई'चे नीरक्षीरविवेक शिकवले. नंतर चारेक दिवसात प्रत्यक्ष तालीम सुरू झाली. केवळ अर्धा तास! लहानगा बिस्मिल्ला थकून जायचा बिचारा! रोज अर्धातास तालीमी नंतर दुपारच्या भोजनानंतर तगडा रियाज असा 'गुरुकुल' पद्धतीप्रमाणे दिनक्रम सुरू झाला.

एके दिवशी बिस्मिल्लाने हिंमत एकवटून आपल्या मामूंकडे वाराणसी-बालाजी मंदिरातल्या एका लहानशा जागेची, रियाजासाठी मागणी केली. णामूंनी तशी सोय करून देताच बिस्मिल्ला तासनतास त्या खोलीत रियाज करू लागला. माहौल पहा! मंदिराचा देवत्वाने भारलेला तो संपूर्ण परिसर आणि त्याच पवित्र



देवस्थान परिसरातली ती खोली! त्या खोलीच्या गाभाऱ्यात शहनाईचे मंजुळ स्वर, तर अगदी थोडयाच अंतरावर गंगेचं खळाळतं पाणी! व्वा! बिस्मिल्लाने आपल्या रियाजाव्दारे 'शहनाई' वर हुकुमत मिळवण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरू केले. याच काळात सुदैवाने त्याला अनेक दिग्गजांची गायकीही ऐकायला मिळू लागली. याच टप्प्यावर त्याने 'आलापी' ही कला, गायकी अंगाने फुलवण्याचं, विकसित करण्याचं मनावर घेतलं. प्रथमतः ऐकून आत्मसात केलेल्या 'ठुमरी', 'चैती', 'कजरी', 'दादरा' आणि 'पूरबी धून' या संगीत प्रकारांतून 'शहनाईवादनाचा' रियाज केला. त्यानंतर 'ख्याल' संगीताशी दोस्ताना केला. बिस्मिल्लांच्या कलेला हळुहळू पैलू पडत होते! शहनाईतून मनःपूर्वक 'शहद की मिठास' असलेल्या मुलायम स्वरात धून निर्माण करण्याचं तंत्र आत्मसात केलं. त्या वादनातली गोडी मामूंना आवडली, परंतु ती ऐकून आजोबा मात्र वैतागले! म्हणाले..'अरे, सच्च्या शहनाई वादकांचं

खानदान आपलं! पुटपुटल्यासारखं पुचाट काय वाजवतोस? सिंह गर्जना कर! अशी लवचिकता नाही कामाची..!' त्याच्या हातातून शहनाई जवळजवळ हिसकावून घेत त्यांनी त्याच 'सुरावटी' दमदारपणे वाजवून दाखवल्या. आजोबांकडच्या पुढच्या काही दिवसांच्या वास्तव्यात बिस्मिल्लाला मग आक्रमक शैलीच्या वादनाचे धडे मिळू लागले. जीव घुसमटला त्यांचा! एकीकडे तो पहेलवानासारखा खुराक, आक्रमक रियाज! खरं तर, बिस्मिल्लांच्या प्रकृतीला त्या गोष्टी मानवणाऱ्या नव्हत्या. पण काय करणार! 'आलिया भोगासि, असावे सादर..'! काहीही असो! कालांतराने त्या 'तालिमीं' मुळे त्यांच्या वादनात सजीवता आली; पण त्यांनी आपल्या वादनातील हळुवारपणा मात्र सोडला नाही! या अभ्यासातून 'लयकारी', 'तान-फिरत' तसेच 'दम-सास' पक्का झाला, हेही नसे थोडके! आपल्या आजोबांचा 'स्टॅमिना', पिताजींची 'लयकारी' आणि मामूंकडची सादरीकरणातील 'मिठास', हा 'त्रिवेणीसंगम' आता बिस्मिल्ला खाँसाहेबांच्या वादनात आपसुकच येऊ लागला!

१९३० साली बिस्मिल्लांच्या जीवनात एक मंगलदिन उगवला. मामूंना 'अलाहाबाद संगीत सभेचं' निमंत्रण मिळालं होतं. चौदा वर्षे वयाचा निरागस असा बिस्मिल्ला.. नेण्याविषयी हट्ट करून उभा होता. आता हीच वेळ योग्य आहे हे मामूंनाही उमगलं! 'वटवृक्षाच्या सावलीत दुसरं नाजुक झाड फोफावणार नाही', हे सत्य स्वीकारत, त्यांनी बिस्मिल्लाला थेट रंगमंचावर पेश केलं! बिस्मिल्लाने राग 'केदार'चा मस्त आलाप घेतला, आणि मामूंनी आपल्या वादनाने त्यावर कोरीव काम केलं! उपस्थित थक्क झाले! पुढच्या सादरीकरणातील बिस्मिल्लाकृत

'बंदिश' ऐकताच टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला! प्रेक्षागारात उपस्थित असलेल्या 'आफ़ताब-ए-मौसिकी - उस्ताद फैयाज़ खाँसाहेबांनी' (आग्रा घराणे) बिस्मिल्लाला प्रत्यक्ष भेटून अगदी मनापासून भरभरून दाद दिली आणि इथेच बिस्मिल्ला यांना 'शहनाईनवाज़' म्हणून मानवंदना मिळाली! आणि सोळावं लागताच, त्याला घरच्यांनी लग्नाच्या बेडीत अडकवलं! मोठ्या मामूंची मुलगी सून म्हणून घरात आली! तिचा पायगुण किंवा बिस्मिल्लांची करामत! त्यांना 'अखिल भारतीय संगीत सभेची' काही सुवर्णपदके मिळाली!

१९३४ साली कलकत्ता (आता 'कोलकाता'!) इथे पार पडलेल्या 'ऑल इंडिया म्युझिक कॉन्फरन्स' या संगीत संमेलनातून 'बेगम अख्तर' (७ ऑक्टोबर, १९१४ - ३० ऑक्टोबर, १९७४) यांनी पदार्पण केल्याचं सांगतात. या संमेलनाचं केवळ नेपाळ-बिहारमधील तत्कालिन भूकंप ग्रस्तांच्या मदतनिधीसाठी खास आयोजन करण्यात आलं होतं. सुप्रसिद्ध कवयित्री श्रीमती सरोजिनी नायडू यांनी, खूपच प्रशंसा केली होती. आपल्या बिस्मिल्लाजींना पहिला मोठा ब्रेक मिळाला तो सन १९३७ मध्ये कलकत्ता इथे पार पडलेल्या 'ऑल इंडिया म्युझिक कॉन्फरन्स' या संगीत संमेलनात! यामुळे बिस्मिल्लाजींना सुद्धा खूपच प्रसिद्धी मिळाली. त्यांच्या नावाला प्रसिद्धीचं एक जबरदस्त वलय प्राप्त झालं! (बिस्मिल्लाजी हे 'बेगम अख्तरजींच्या' गायकीचे निस्सिम चाहते होते. 'दीवाना बनाना है, तो दीवाना बना दे..' हे तर खास आवडीचं! त्यांना चित्रपट पाहण्याचाही शौक होता म्हणतात. सुलोचना या त्यांच्या आवडत्या अभिनेत्री होत्या.)

शनिवार दि. १६ एप्रिल, १९३८ हा दिवस बिस्मिल्लासाहेबांसाठी भाग्यवंत ठरला. 'लखनौ आकाशवाणी'च्या उद्घाटनाबरोबर त्यांची सांगीतिक कलाकीर्द अधिकाधिक आकार घेऊ लागली आणि याच टप्प्यावरून त्यांनी कधीच मागे वळून पाहिलं नाही! त्यांच्या कलेला सन्मान मिळू लागला! त्यांची कीर्ति संपूर्ण देशभरात पसरली. आपला भारत देश स्वातंत्र्याच्या उंबरठयावर असताना बिस्मिल्ला खाँसाहेब, यशाच्या उत्तुंग मनोऱ्यावर होते. मात्र त्यांचं वागणं तस्संच सालस, निर्व्याज आणि निरागस होतं, हे वैशिष्ट्य!

भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने 'बिस्मिल्ला खाँसाहेब' यांनी लाल-किल्ल्यावर 'शहनाई' वाजवली याविषयी सविस्तर सांगायचं तर.. ब्रिटिशांतर्फे दि. ३ जून, १९४७ रोजी योजना आखली गेली. देशांच्या सीमा ठरवण्यासाठी आयोग व घटना लिहिण्यासाठी समिती या तरतुदी केल्या गेल्या. सर्व गोष्टींना मान्यता मिळताच भारत शुक्रवार दि. १५ ऑगस्ट, १९४७ स्वतंत्र होणार हे जवळजवळ निश्चितच झालं. (कृपया 'व्हिडिओ' पहा.) 'बिस्मिल्लांजींची' कीर्ति पंडितजींपर्यंत सुद्धा पोहोचली होतीच. म्हणूनच पंडित नेहरूजींना वाटलं, की या मंगल क्षणी 'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांची' शहनाई वाजलीच पाहिजे! स्वातंत्र्यदिनाच्या समारंभाचं नियोजन पाहणाऱ्या संयुक्त सचिवांकडे जबाबदारी देण्यात आली की, या क्षणी बिस्मिल्ला खान कुठे आहेत? त्याचा तातडीने शोध घेऊन त्यांना दिल्लीतल्या कार्यक्रमासाठी आमंत्रित करावे! मग काय? चक्रे फिरली! चौकश्या, शोध सुरू झाले. ते मुंबईत होते. त्यांना, साथीदारांसोबत सन्मानपूर्वक एका खास विमानाने

दिल्लीत आणलं गेलं! आणि 'सुजान सिंह पार्क' इथे 'राजकीय शाही पाहुणे' म्हणून सर्वांच्या राहण्याची सोय करण्यात आली. 'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांवर' माहितीपट बनविणाऱ्या, पुस्तक लिहिणाऱ्या 'जुही सिन्हा' सांगतात की, देशाच्या स्वातंत्र्यदिनी सनई वाजवण्याबाबतीत ते खचितच उत्सुक होते. मात्र आपण लाल किल्ल्याच्या प्रांगणात चालत चालत शहनाई वाजवू शकणार नसल्याचं त्यांनी नम्रपणे सांगितलं. त्यावेळी  नेहरूजी त्यांना म्हणाले..'तुम्ही एखाद्या सर्वसाधारण कलाकारासारखं चालायचं नाहीय.. तुम्ही पुढे चालाल आणि तुमच्या मागून मी आणि संपूर्ण देश चालेल..!' बिस्मिल्ला खाँसाहेब आणि त्यांच्या साथीदारांनी सनई वाजवून स्वतंत्र भारताच्या पहाटेचं स्वागत केलं! आणि.. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर आपल्या देशाचा तिरंगा डौलाने फडकताना त्याला सलामी देण्याचं भाग्य लाभलं ते.. 'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांना' आणि त्यांच्या 'शहनाईला'! कुर्निसात उस्तादांना! (१९९७ साली ज्यावेळी भारताच्या स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा केला गेला, त्यावेळीही लाल किल्ल्यावर 'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांनी' सनई-वादन केलं होतं. आज उस्तादजी आपल्यात नाहीत. परंतु प्रत्येक वर्षी लाल किल्ल्यावर होणाऱ्या 'स्वातंत्र्यदिनी' आपल्या 'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांची' शहनाई वाजतेच वाजते! हे विशेष! (महत्त्वाचं सांगायचं तर : आपल्या देशाच्या 'स्वातंत्र्यदिनी' ध्वजारोहण केलं जातं, तर 'प्रजासत्ताक दिनी' ध्वज फडकवला जातो. 'लिंक' पहा! हे दोन्ही दिवस आपले आनंदी 'उत्सव' आहेत. या दिवशी काही

सिनेमातली ‘अमुक’ गाणी वाजवणं तर पूर्णतः चुकीचं आहे! आपल्याला ‘स्वातंत्र्य’ हे ‘ब्रिटिशां’ कडून मिळालं होतं. ‘चीन’ किंवा ‘पाकिस्तान’ कडून नाही! होय ना!)

काळ पुढे जात होता. बिस्मिल्ला खाँसाहेबांचं कुटुंबही वाढत होतं. वाढत्या कुटुंबाची जबाबदारीही वाढत होती. साथीचे अनेक वादक आणि मुख्य म्हणजे एकीकडे त्यांच्याकडे ‘गुरुकुल’ पद्धतीने शिकणाऱ्या ‘शिष्यांची’ संख्या सुद्धा वाढत होती. पण अल्लातालाच्या कृपेमुळे भरपूर कार्यक्रम, तसेच जलसे होत असत, त्यामुळे उस्तादजी समाधानी होते. सदानकदा खुश असायचे! उस्तादजी मुस्लीम समुदायातील ‘शिया’ पंथीय होते. ते आपल्या धार्मिक परंपरेनुसार भक्तिभावाने पाच वेळा ‘नमाज’ सुद्धा अदा करत असत. परंतु मुस्लीम समुदायाच्या धार्मिक



समुदायाच्या धार्मिक परंपरेनुसार, संगीत/गाणं/बजावणं हे पूर्णतः निषिद्ध आहे, म्हणतात! त्यांचं हे संगीत क्षेत्रात कार्यरत असणं त्यांच्या पंथातील पुरोगामी विचारसरणीच्या लोकांना पटत नव्हते! परंतु बिस्मिल्लाजींनी आपल्याच नव्हे तर

इतर सर्व धर्मांचा समान आदरच केला. त्यांच्यासाठी ‘संगीत’ हाच एक धर्म होता. उस्तादजी चक्क ‘देवी सरस्वतीचे’ उपासक सुद्धा होते बरं! (योगायोग सांगायचा तर अशीच मानसिकता आपल्या अब्बाजान ‘तबला नवाज़’ उस्ताद ‘अल्ला रख्खा’ साहेब (२९ एप्रिल, १९१९ ते ३ फेब्रुवारी, २०००) यांची सुद्धा होती! (आणि त्यांच्या कुटुंबातील दिग्गजांची सुद्धा आहे!, हे विशेष!) बिस्मिल्लाजी अनेकदा सांगत असत की, त्यांना भगवान शिवशंकर, देवी सरस्वती व स्वतः भगवान श्रीकृष्णाने कला निर्माण करण्याची क्षमता दिली आहे. एक आठवण सांगायची तर, कुंभमेळयातील एका कार्यक्रमात त्यांनी एक नवीनतम राग सादर केला होता. त्या सादरीकरणाने रसिकप्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले होते. प्रेक्षकांनी त्यांना तो राग पुनःपुन्हा आळवण्याची विनंती केली. हा नवीनतम राग होता.. ‘कन्हैरा’! या रागाच्या उत्पत्ती आणि या कार्यक्रमाविषयी दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. प्रसिद्ध बासरीवादक व संगीतकार पं. हरिप्रसादजी चौरसिया (‘शिव-हरी’ फेम) यांनी या बातमीने प्रभावित होऊन बिस्मिल्ला खाँसाहेबांशी लागलीच संपर्क साधला. बिस्मिल्लाजी त्यांना म्हणाले की..‘..हा राग, ही भगवान श्रीकृष्णाचीच देन आहे. जणू माझा त्यांच्याशी संवाद झाला, असं म्हणायला हरकत नाही! ‘जमशेदपूर’ ते ‘बनारस’ असा माझा तो रेल्वेप्रवास होता. मला तिथे काहीतरी नवीन सादर करण्याची मनोमन इच्छा होती. मी काही नवं सुचतं का, या मानसिकतेत निवांतपणे डोळे मिटून पहुडलो असताना अचानक बासरीचे स्वर माझ्या कानावर पडले. मी उठून बसलो. तो मुलगा बासरी

वाजवत जवळ येत होता. गडद काळया वर्णाच्या मुलाच्या हातात बासरी होती आणि तो तन्मयतेने कोणता तरी 'राग', कसलीशी 'धून' वाजवत होता. पण तो राग, त्या आलापी आणि ताना, मी त्या आधी कधीही ऐकल्या नव्हत्या! मी तो 'राग' ओळखूच शकलो नाही. रहस्यमय होतं सगळं. मी त्याला जवळ बसवलं. आणि ती 'धून' पुनःपुन्हा वाजवायला सांगितली. तो चमत्कारच होता जणू! ती 'धून' माझ्या मनात घर करून गेली. मी तेच सादरीकरण तिथे केलं आणि प्रेक्षकांना अतिशय आवडलं!..' बिस्मिल्लाजींनी त्या रागाला 'कन्हैरा' हे नाव दिलं, कारण त्यांना तो 'राग' जणू साक्षात भगवान श्रीकृष्णाच्या रूपात त्यांना सामोरा आला होता.

त्यांना विमानप्रवासाची अत्यंत भिती वाटायची. (१५ ऑगस्ट, १९४७ च्या सोहळयासाठी जेव्हा ते आयुष्यात पहिल्यांदाच दिल्लीला, ते त्या एका खास 'प्लेन' ने गेले ना! तेव्हां त्यांनी 'मुंबई ते दिल्ली' हा संपूर्ण प्रवास चक्क डोळे गच्च मिटूनच केला होता.. हा किस्सा उस्तादजींच्या साजिंद्यातील एका बुजुर्ग वादकाने जेव्हा, दस्तुरखुद्द उस्तादजींसमोरच आवर्जून सांगितला होता ना! तेव्हा उस्तादजी अगदी निरागस बालकासारखे मनमुराद हसले होते.) उस्तादजींचा पहिला 'विमान' प्रवास भले भयंकर दडपणात, भीतीच्या मानसिकतेत पार पडला, पण नंतर परदेशातील विविध कार्यक्रमांचे आयोजक व रसिकांच्या आग्रहाखातर त्यांना 'विमानप्रवास' करावेच लागले. सततच्या एकत्रित सादरीकरणांमुळे अत्यंत जिवाभावाचे मित्र झालेल्या पं. रविशंकरजी, उस्ताद अली अकबर खाँसाहेब, उस्ताद विलायत खाँसाहेब अशा दिग्गजांच्या आग्रहामुळे सुद्धा त्यांना सतत 'विमान' प्रवास करावेच

लागले! त्यांना परदेशात 'शहनाई वादनाचे' तसेच 'जुगलबंदीचे' अनेक कार्यक्रम करावेच लागले! अल्लातालाची, जणू इश्वराचीच कृपा होती ती! त्यांची विमानप्रवासाबद्दलची भीती दूर झाल्याने की काय! त्यांना सहकुटुंब 'हज-यात्रा' करणं सुद्धा शक्य झालं! लंडन, फ्रान्स, इराण, इराक, कॅनडा, आफ्रिका, अमेरिका, रशिया, जपान, हाँगकाँग अशा जगातील जवळजवळ सर्वच महत्त्वाच्या स्थळी आपले कार्यक्रम, जलसे, जुगलबंदी तिथल्या रसिकांना अनुभवायला मिळाली! खरंतर 'गायकी' अंगाने वाजणारी त्यांची 'शहनाई' सर्वांनाच आवडू लागली होती. मोठमोठया दिग्गजांबरोबर मैफिली सजवण्याची संधी मिळू लागली होती. जगभरातून सन्मान होतं असूनही त्यांनी आपला 'ईगो' मात्र कधीच कुरवाळला नाही. ते तस्सेच राहिले! साधे, सरळ आणि सालस. 'चवदार फळांनी डंवरलेलं झाड, हे सदानकदा झुकलेलंच असतं..' ही प्रचिती उस्तादजींच्या वागण्यातून सतत दृग्गोचर होत असे, हे आम्ही सुद्धा अनुभवलंय बरं! आश्चर्य म्हणजे आपल्याला 'ज्युनियर' असलेल्या कलावंतासोबत 'जुगलबंदी' करायलाही ते अजिबात आढेवेढे घेत नसत, हे विशेष! आत्मविश्वास असलेला हा समर्पित कलावंत 'उस्ताद विलायत खाँसाहेब', 'उस्ताद अमजद अली खाँसाहेब', 'उस्ताद हलिम जफ़र खाँसाहेब' तसेच 'पं. रविशंकरजी', 'विदुषी गिरीजादेवी', 'विदुषी डॉ. एन. राजम', 'पं. रामनारायणजी', 'पं. व्ही. जी. जोग' अशा सर्वांबरोबर त्याच ताकदीनं 'जुगलबंदीतून' रसिकांपुढे आला. माझं संगीत हाच माझा श्वास! सात स्वच्छ, पाच कोमल स्वर या बारा सुरांचेच माझे विश्व! आणि हीच माझी 'इबादत'!

हाच माझा ‘नमाज’! आपल्या कलागुणांना ‘परमेश्वराचरणी’ अर्पण करावं या भावभावना ‘ग्रेटच’ नाही का?

एक खास आठवण शेअर करतोय! तुम्ही ‘उस्ताद झाकीर हुसेनजी’ (ज्यांचं मूळ वाद्य हा ‘तबला’) आणि ‘पं. सुरेश वाडकरजी’ (प्रथितयश शास्त्रीय गायक/शिक्षक, ज्येष्ठ पार्श्वगायक!) यांना आपण एका वेगळया स्वरूपात पाहिलंय का! (ही ‘लिंक’ पहा!!) इथे आपले ‘पं. सुरेश वाडकरजी’ चक्क तबला वाजवताहेत! तर, ‘उस्ताद झाकीर हुसेनजी’ मस्त गाताहेत! होय! असंच आपल्या ‘उस्ताद बिस्मिल्लाजी’ बाबतीत सुद्धा एकदा घडलंय बरं! तो ‘जुगलबंदी’चा एक कार्यक्रम होता! ‘उस्ताद विलायत खाँसाहेब’ यांची जानलेवा सतार आणि ‘उस्ताद बिस्मिल्लाजी’ यांची आपल्या हृदयात घर करणारी जबरदस्त शहनाई! जी त्यांची मूळ वाद्ये आहेत! या दोघांचं ‘टयुनिंग’ तर लाजवाब होतं! हे तर सर्वश्रुतच आहे! गंमत म्हणजे.. जिव्हाळयाची मैत्री असल्याने ऐन ‘जुगलबंदी’ मध्ये, अगदी अचानक ते अक्षरशः एकमेकांवर कुरघोडी करू पहायचे! चक्क ‘मुकाबला!’ ते दुसऱ्याला अचानक कोंडीत पकडायचा प्रयत्न करायचे! अर्थात यात काहीतरी मस्त सादर व्हावं हाच प्रंजळ हेतू असायचा! आणि ते दोघं मैफिलीत रंग भरण्याच्या हेतूने काहीतरी मस्ती/छेडछाड सुद्धा करायचे! तर, त्या एका मैफिलीत.. केवळ एक मस्त ‘ठुमरी’ हा प्रकार सादर करायचा म्हणून, ‘उस्ताद विलायत खाँसाहेबांनी’ काय करावं!? आपल्या ‘सतारीवर’.. त्यांनी अगदी सहजपणे सुचलेलं ‘मुघल-ए-आजम’ (१९६०) या सिनेमातलं.. ‘मोहे पनघट पे नंदलाल छेड..’ (गायिका :

लतादीदी, गीतकार : शकील बदायुनी, संगीतकार : नौशादजी) हे गाणं, वाजवायला सुरुवात केली. आपला अगदी जिव्हाळयाच्या 'बिस्मिल्लाभाईला' उद्युक्त करायचं, छेडायचं हाच त्यांचा हेतू होता बरं! काय झालं माहित्येय का?! अचानक, आपले 'उस्ताद बिस्मिल्लाजी' गायले! होय, ते चक्क गायले! (फोटोवर 'क्लिक' करा!) व्वा! खरंच! आपण खरंच भाग्यवान आहोत! त्या काळातील सर्वच 'दिग्गजांना' सलाम! त्याच शतकात आम्ही जन्मलो! हे आमच्यासाठी विशेष!

'व्हीनस' या मातब्बर म्युझिक कंपनीमध्ये मी 'ध्वनिमुद्रण अधिकारी' या पदावर कार्यरत असताना अनेक 'रेकॉर्डिंग स्टुडिओ' मध्ये, भल्या-भल्या गायकांची भंबेरी उडालेली मी या डोळयांनी पाहिलीय, त्याच माईकवर 'उस्ताद बिस्मिल्लासाहेबांच्या' शहनाईचे सच्चे सूर वाजताना पाहून कृतकृत्य झाल्याची अनुभूती मिळाली. 'शहनाई'च्या बेजान बोरूवर त्यांनी संगीताचा जो नजारा उभा केलाय की त्याला तोड नाही! आपल्यासारख्यांना जिथे शीळ वाजवणंही कठीण जातं तशाच प्रकारच्या फुंकरीने सनईवरच्या त्या छिद्रांवर आपली बोटे फिरवत, आवश्यक तितकीच हवा अलगदपणे बाहेर येईल याची पूर्णतः काळजी घेत मिंडकाम



करण्याची त्यांची हातोटी थक्क करणारी होती. सुप्रसिद्ध सतारवादक व दिग्गज संगीतकार ('शांक-नील' फेम!) सन्माननीय डॉ. (पं.) शशांकजी कट्टीसाहेब (ते जगविख्यात 'संगीतोपचारक' सुद्धा आहेत बरं!) यांच्या संकल्पनेतून, आमच्या कंपनीच्या 'क्लासिकल गॅलक्सी' या श्रृंखलेमध्ये अनेक दिग्गज प्रभृतींचे 'अल्बम्स्' बनवणं सुरु होतं. 'उस्ताद बिस्मिल्ला साहेबांचे' काही अल्बम्स करण्याचा प्रस्ताव 'बॉसने' लागलीच मंजुर केला. नंतर पं. शशांकजी तो प्रस्ताव घेऊन खास बनारसला 'उस्तादजींकडे' गेले. 'बिस्मिल्लाजींनी' अनुमोदन देताच, त्या 'प्रोजेक्टची' आखणी सुरु केली! त्यांचा बारा जणांचा 'ग्रुप' येणार, हे निश्चित होताच, आम्ही त्या सर्वांचे 'डिटेल्स' मागवले. 'बॉस' श्री. चंपकजींनी, ते 'लाईफ-मेंबर' असलेल्या, जुहूच्या 'सेंटॉर' या पंचतारांकित हॉटेलात त्या सर्वांचं बुकिंग केलं. तारखा ठरताच मुंबईच्या 'फोर्ट' विभागातील सुप्रसिद्ध 'वेस्टर्न आऊटडोअर स्टुडिओ' बुक केला गेला. (आता पुढे जे सांगतोय, यातून आपले 'बिस्मिल्लाजी' किती साधे, सरळ व कलासक्त होते याची तुम्हाला खचितच प्रचिती येईल.) तर.. त्या सर्वांना आणण्यासाठी 'एअर-पोर्टवर' गाडया रवाना झाल्या. पण राहण्याची व्यवस्था जुहूचं 'सेंटॉर हॉटेल' म्हणता, ते काहीसे हिसमुसले झाले होते. मग त्यांचा तरूण शागीर्द अब्बासमियाँने पुढे येत आमच्याशी संवाद साधला! आम्ही संभ्रमात! पण त्याने जे सांगितलं त्यात 'लॉजिक' होतं हे मात्र खरं! स्टुडिओत वेळेत पोहोचण्यासाठी जुहू ते फोर्ट हा भयंकर 'ट्रॅफिक' असलेल्या रस्त्याने तो दूरचा प्रवास, राहण्याची व्यवस्था! (त्यात ते सर्वथा नवखं हॉटेल!) वगैरे वगैरे! मग त्यांनी

सुचविल्याप्रमाणे, त्या सर्वांची आम्ही, सर्वार्थानं परिचित असलेल्या, मुंबई सेंट्रल रिझर्व बँक कॉलनीजवळच्या 'हॉटेल साहिल' इथे सोय केली. (किती हा साधेपणा! सॅल्यूट!!) ती संध्याकाळ काहीशी निवांत असल्याने पं. शशांकजींनी त्यांच्याशी संवाद साधला. याआधी उस्तादजींचे इतर म्युझिक कंपन्यांच्या अल्बम्स् मधून 'राग हमीर', 'बहार', 'रागेश्वरी', 'शिवरंजनी', 'अहिर भैरव', 'भटियाली', 'ललित', 'पिलू' अशा अनेक रागांचं सादरीकरण झाले असल्याने, 'शास्त्रीय संगीताचे अभ्यासक' सन्मा. पं. शशांकजींनी आपण काहीसे वेगळे राग निवडले असल्याचं 'उस्तादजींना' आपलेपणाने सांगितलं! पं. शशांकजींचा अभ्यास पाहून थक्क होत 'उस्तादजींनी' त्यांच्या संकल्पनेला लागलीच अनुमोदन दिलं. पं. शशांकजींनी 'राग नंद केदार', 'राग जौनपुरी' निवडले होते आणि त्या सोबत आम्हाला 'उत्सव' या विषयावर सुद्धा आपले 'रेकॉर्डिंग' करायचंय हे आवर्जून सांगितलं. दुसऱ्या दिवशी सकाळी तो लवाजमा 'वेस्टर्न आऊटडोअर स्टुडिओ' मध्ये दाखल झाला. तिथले जिनियस 'प्रमुख रेकॉर्डिंग इंजिनियर' श्री. दमन सूदसाहेब व श्री. अविनाशजी ओकसाहेब यांनी त्यांचं स्वागत केलं. आमचे 'बॉस' सुद्धा आवर्जून उपस्थित होते. सादरीकरण तर झकास झालं. वाटलं होतं त्यापेक्षा अल्प वेळात झालं, हे विशेष! काही तासांचं हे 'ध्वनिमुद्रण' खरं, पण 'उस्तादजींच्या' मनमोकळया स्वभावामुळे अगदी खेळकर वातावरणात ते बिनबोभाटपणे पार पडलं बरं! तर करारनाम्याप्रमाणे सर्व 'ध्वनिमुद्रण' झालं म्हणता सर्वांनाच हायसं वाटलं होतं. आता आवरा-आवर करणार तोच आमचं

‘उस्तादजींकडे’ लक्ष गेलं. ते ‘शहनाई’ हातात घेऊन तसेच बसून होते. साजिंदे सुद्धा त्यांच्या या कृतीने तसेच थबकले! आम्ही चिंताक्रांत! पं. शशांकजीं त्यांच्या जवळ गेले.. ‘काही कमी-अधिक झालं का?’ हा हेतू होता त्यांचा! ते म्हणाले.. ‘दो ज्यादा चीजे देना चाहता हूँ.. चाहिए तो उसे इस्तेमाल जरूर करना!..’ आम्ही थक्क! (‘कॉपिराईटस्’ वगैरे नियमांप्रमांणे, त्या व्यावसायिक करारनाम्यानुसार म्युझिक-कंपनीला हवं होतं ते सर्व ‘रेकॉर्ड’ झालं होतं. मुख्य म्हणजे ते अतिशय समाधानकारक झालं होतं. त्यानुसार मानधानाची रक्कम, कागदपत्रे सुद्धा तयार होती. प्रश्न हा होता की वाढीव सादरीकरणामुळे मानधनाच्या ‘चेक’ मध्ये बदल कसा करायचा! आणि संबंधित ‘कागदपत्राती’ त्या नवीन गोष्टींचा ‘ऑन-द-स्पॉट’ उल्लेख कसा करायचा! महत्त्वाचं म्हणजे या कायदेशीर खाचाखोचा, मानधन वगैरे गोष्टी त्या सन्माननीय, सुस्वभावी व सालस तसेच पितृतुल्य अशा एका ‘पद्मपुरस्कारप्राप्त उस्तादजींना’ कशा सांगणार! कोण सांगणार! हा तर आणखी मोठा प्रश्न होता.) पं. शशांकजींनी ‘बॉसकडे’ प्रश्नार्थक मुद्रेने पाहिलं. त्यांनी क्षणार्धात नेत्रपल्लवी करत होकार भरला! झालं. त्यांनी अगदी उत्साहाने जीव ओतून ‘पुरबी’ व ‘चैती’ धून रेकॉर्ड केली. ते करून होताच ‘पॅक-अप’ असं ते स्वतःच म्हणाले. त्या क्षणी त्यांच्या चेहऱ्यावर, आपल्या आवडीचं काहीतरी सादर केल्याचा आनंद विलसत होता. एकीकडे त्यांचे शागीर्द व साजिंदे आवरा-आवरीत गुंतले तर आमचे ‘बॉस’ व पं. शशांकजी त्यांच्याकडे कागदपत्र आणि मानधनाचा ‘धनादेश’ घेऊन गेले. त्यांचे स्वाक्षरी वगैरे ‘सोपस्कार’ करून होताच, त्यांना

मानधन सुपुर्द करताना पं. शशांकजींनी त्यांना नम्रपणे विचारलं.. 'उस्तादजी.. आपने अभी अभी जो खास धूने रेकॉर्ड की है.. उसका..' त्यांनी पं. शशांकजींना इशाऱ्यानेच थांबवत ते शांतपणे म्हणाले.. 'बेटा.. मैने वो पेशकश, केवल अपने ख़ुद के मन की तसल्ली के लिए की है! चाहिए तो इस्तेमाल करो.. या फिर..!' काय बोलणार? आम्ही नतमस्तक झालो! त्यांचे ते शब्द मनावर कायमचे कोरले गेले आहेत. (मित्रांनो.. आम्ही या 'म्युझिक-इंडस्ट्रीत' बरेच अनुभव घेतलेत. एखादा अधिकचा मंत्र, आलाप गायला किंवा अधिकचं वादन केलं तर, अतिरिक्त मानधनासाठी त्या बिचाऱ्या पेमेंट देणाऱ्यांबरोबर 'तू तू मैं मैं करणारे' बरेच मोठे नामचिन कलावंत, मी स्वतःच्या डोळयांनी पाहिलेत!) तर! हा कलावंतच वेगळा होता! साधा सरळ! 'मी पणा, ईगो, माज..' या कशाचाच स्पर्श न झालेला! यामुळेच की काय, पं. नेहरूजींना देशाच्या स्वातंत्र्याच्या पहिल्या सूर्यदर्शनाचा प्रारंभ करण्याचा मान 'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांच्या' शहनाईवादनाने करण्याचं सुचलं असावं! तसेच पितृतुल्य सन्माननीय बाळासाहेब ठाकरेसाहेबांना त्यांची 'मैफल' करावीशी वाटली असावी.



शिरडीच्या साईमंदिर परिसरातच नव्हें तर महाराष्ट्रातील ‘शेगाव’सह सर्व देवस्थाने, शक्तिपीठांसह अनेक देवस्थानात यांची ‘शहनाई’ ही नेहमीच वाजवली जाते! आपल्यासारख्या सामान्यांनाही, आपल्या आयुष्यातील सर्व आनंददायक, उत्सवी क्षणात त्यांच्या ‘शहनाई’ वादनाची मिठास असावी असं मनोमन वाटत असतं. त्यांना ‘भारतरत्न’ देऊन खरंतर तो पुरस्कारच गौरविला गेला आहे. मोजून चार नामांकित विद्यापीठांतर्फे डॉक्टरेट आणि नंतर पद्मश्री, पद्मभूषण तसंच शेकडो ॲवॉर्डस् मिळवूनही आपले उस्तादजी हे अगदी साधेच राहत. ‘डाऊन-टू-अर्थ’ म्हणतात ना तस्संच! कुटुंबातल्या मोजून ७० सदस्यांना (मूलं, त्यांचं कुटुंब, नातू , पणतू असा तो परिवार) आणि ‘गुरुकुल’ पद्धतीने उस्तादजींची ‘शागिर्दी’ करणारे लाडके शिष्य, ‘टयुनिंग’ जमलेले ‘साजिंदे वादक’! यांना आनंददायक आयुष्य देत ‘पोसणं’ जमत होतं ते केवळ आणि केवळ कार्यक्रमातून मिळणाऱ्या मानधनाच्या रकमेतून! पण त्यांनी या गोष्टीचा बाऊ करत आपल्या ‘मानधनात’ अवास्तव वाढ कधीच केली नाही! शास्त्रीय संगीत क्षेत्रात तसेच आमच्या म्युझिक-इंडस्ट्रीत आपापल्या क्षेत्रात माहीर असणारे बरेच ‘शहनाई-वादक’ होते/आहेत. परंतु का कुणास ठाऊक! त्यांचा आपल्या ‘उस्ताद बिस्मिल्लासाहेबांइतका’ बोलबाला नव्हता. (अपवाद.. संगीतकार ‘रामलालजी’!) हे आम्ही प्रत्यक्ष पाहिलंय! अनुभवलंय! त्यातील अनेकजण आपली एकलव्यागत केलेली उपासना ही थेट ‘उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांच्या’ कलाकिर्दीशी समर्पित आहे, ही गोष्ट ते

स्पष्टपणे सांगायला धजावत नसत. परंतु जाणकार संगीतकार, त्याचं मूळ बीज नेमकं कुठलं आहे हे पूर्णतः जाणून होते, याबद्दल शंकाच नाही!

या प्रभावळीत आपल्याला ठळकपणे नाव आठवतं ते 'रामलालजी चौधरींचं'! बासरी व शहनाईवादक तसेच संगीतकार असलेल्या 'रामलालजींचं'! तुम्ही म्हणाल 'बिस्मिल्लाखाँहिबांच्या' या ई-बुकमध्ये संगीतकार 'रामलालजींचा' विषय कशाला! मित्रांनो, आपण 'शहनाई' या वाद्याविषयी बोलतोय ना! मग सगळे पहलू अभ्यासायला काय हरकत आहे! केवळ याचसाठी हा माझा अट्टहास! खटाटोप! 'रामलालजी' हे अतिशय जिनियस वादक, संगीतकार होते, परंतु काहीसे दुर्लक्षित! रामलालजी (१५ ऑगस्ट, १९२२ - ४ जुलै, २००७) हे मुळचे 'बनारस'चेच! आमच्या मालवणी भाषेत सांगायचं तर.. त्यांचे 'गाववाले'! 'एखादी उत्तुंग भरारी घेण्याची आंतरिक इच्छा असलेली वेल, जशी आपल्या जवळच्या मजबूत झाडाला वेढून घेते ना!' तस्संच होतं सगळं! त्यांचं सुदैव पहा! योगायोगाने ते लहानपणी 'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेब' यांच्यामुळे शहनाईकडे, तर 'पं. पन्नालालजी घोष' (मूळ बनारस!) यांच्यामुळे 'बासरी'कडे आकर्षित झाले होते. (त्यांनी या दिग्गजांची 'शागीर्दी' केली किंवा काय, याची माहिती नाही.) मात्र त्यांची शहनाई ऐकणं हा सुद्धा एक आनंदसोहळा असायचा. हुकुमत होती शहनाईवर! 'गायकी' अंगाने जाणारं त्यांचं वादन ऐकताना त्यावर 'उस्ताद बिस्मिल्लासाहेबांची' पूर्णतः छाप असल्याचं बुजुर्ग संगीत अभ्यासक सांगतात.

'आग' (१९४८ - संगीत : राम गांगुली), 'झनक झनक पायल बाजे' (१९५५ -

संगीत : वसंत देसाई), 'नवरंग' (१९५९ - संगीत : सी. रामचंद्र) 'नकाब पोश' (१९५६ - संगीत : रामलाल व धुमी खान) या चित्रपटातील गाण्यांमधलं त्यांचं 'शहनाईवादक' म्हणून योगदान, तर 'ऐ काले बादल बोल..' (दहेज - १९५०), 'गया अंधेरा हुआ उजाला..' (सुबह का तारा - १९५२), 'दिल दिल से कह रहा है..' (परछाईयाँ - १९५२), 'अपनी अदा पर..' (तीन बत्ती चार रास्ता - १९५३) या गाण्यांमधील त्यांचं 'बासरीवादक' म्हणून योगदान थक्क करणारं आहे! 'तकदीर का फ़साना..' (सेहरा - १९६३) हे गाणं रामलालजींच्या संगीतातून रसिकांच्या कानामनात कोरलं गेलंच तर 'नीलकमल' (१९६८) या संगीतकार रवीजींनी संगीतबद्ध केलेल्या चित्रपटातील 'बाबुल की दुवाएं लेती जा..' तर ग्रेटच! ही दोन गाणी रामलालजींच्या संगीतातील 'परमोच्च बिंदू' ठरावीत अशी आहेत. त्यातील दोन्ही गाण्यातील ते काव्य, आणि रफीसाहेबांचं सादरीकरण, त्यांच्या गायकीतील ती आर्तता रसिकांच्या थेट काळजाला भिडणारी ठरली होती. आपल्या लेकीला सासरी पाठवताना एखाद्या पित्याच्या भावभावना 'बाबुल की दुवाएं..' या गाण्यातून जशा व्यक्त झाल्या आहेत तशा ('दुल्हे का सेहरा..' ही नुसरत फतेह अली खाँ यांची कव्वाली वगळता..) कोणत्याच गाण्यातून सामोऱ्या आलेल्या नाहीत. आणखी सांगायचं तर, इतर काही गाण्यामधून



रामलाल (संगीतकार)
15 अगस्त 1922 - 04 जुलाई 2007

रामलालजींच्या शहनाईचा एखादा तुकडा सहजच सामोरा यायचा पण तो त्या गाण्याला नकळत चार चाँद लावायचा! ही यादी पहा! मी ही यादी तुमच्या माहितीसाठी मुद्दाम देतोय! कारण ती हटके आहे! वेगळी आहे! उल्लेखनीय आहे! 'उजाले उनकी यादों के!' म्हणतात ना, तसं! 'गोरे गोरे हाथों में..' (परिणिता - १९५३), 'आए ना बालम वादा कर के..' (शबाब - १९५४), 'बेकस पे करम कीजिए..' (मुघल-ए-आज़म - १९६०), 'सांवरीया रे अपनी..' (आँचल - १९६०), 'हाए सावन बन गए नैन..' (करोडपती - १९६१)! अनेक उदाहरणे देता येतील. तर रामलालजींचं स्वतः संगीतकार म्हणून 'सेहरा' (१९६३), 'गीत गाया पत्थरो ने' (१९६४) या चित्रपती व्ही. शांतारामजींच्या चित्रपटांमधले आणि 'हुस्न बानो' (१९५६) सारख्या चित्रपटातील आविष्कार थक्क करणारे आहेत.

तसं पहायला गेलं तर दस्तुरखुद्द 'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेबांचा' चित्रपटसृष्टीतला सहभाग खूपच मर्यादित असा होता. इतिहासाची पाने चाळता, त्यांचा चित्रपटांशी संबंध आला तोही खूप उशिरा म्हणजे वयाच्या चाळीशीनंतर. १९५८ मध्ये सत्यजीत रे यांच्या आग्रहाखातर 'जलसागर' (संगीत : उस्ताद विलायत खाँ आणि रॉबिन मुजुमदार) या बंगाली चित्रपटात भूमिका केली. यात गायिका 'बेग़म अख़्तर', 'उस्ताद वहिद खाँ', 'उस्ताद सलामत अली खाँ' यांच्याही भूमिका होत्या. 'गुंज उठी शहनाई' (१९५९) मध्ये शहनाईवादन केलं, तीन गाण्यांना चालीही बहाल केल्या. या संपूर्ण चित्रपटातलं 'शहनाईवादन' हे केवळ 'बिस्मिल्लाजींचं' नाहीय. त्यांनी नेमक्या भागात 'शहनाईवादन' केले आहे.

लहानपणी नायक 'राजेंद्रकुमार' जेव्हा गुरूंकडे शिकायला जातो तेव्हाची 'रागमाला' आणि नंतर मोठेपणी तो 'आकाशवाणीवर' नोकरी करताना 'सतारी' बरोबरची 'जुगलबंदी'! हे इतकंच 'बिस्मिल्लाजींचं' शहनाईवादन आहे. चित्रपटात, प्रत्येक गाण्यात आणि पार्श्वसंगीतात जी 'शहनाई' ऐकू येते ती 'रामलालजींनी' वाजवली आहे. नंतर त्यांनी विजय यांच्या 'सनाडी अप्पण्णा' (१९७७) या डॉ. राजकुमार, जयाप्रदा अभिनीत कन्नड चित्रपटात एका शहनाईवादकाची छोटीशी भूमिका साकारली होती. यासाठी त्यांना 'बनारस' येथून खास पाचारण करण्यात आलं होतं. उस्तादजींबरोबर त्यांचे सुमारे दहा साजिंदे, सहकारी होते. 'प्रसाद स्टुडिओ' (मद्रास) इथे ते नऊ-दहा दिवस कार्यरत होते, हे विशेष!

'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेब' हे अतिशय साधे, सालस, निरागस असे सच्चे कलासक्त कलावंत होते! या सन्माननीय पितृतुल्य अशा 'कलंदर' कलावंताची, एकंदर 'कलाकीर्द' तुम्ही सहज म्हणून अभ्यासायला घेतलीत ना! तर आपण चकित होतो! आपले हात, त्यांच्या सन्मानार्थ सहजच आपल्या उजव्या कानाच्या पाळीकडे आपसुकच जातात. त्यांनी सादरीकरण केलेलं 'कुबेरधन' अपरंपार आहे. ते आपल्या ओंजळीत तर कायम राहणार आहे! परंतु त्यांना अनेकाविध पुरस्कारांनी गौरविण्यात आल्याचं लक्षात येताच, आपण मनोमन सुखावतो! त्यांच्या असामान्य कलागुणांमुळे १९५५ मध्ये त्यांना 'नॅशनल कल्चरल ऑर्गनायझेशन' या राष्ट्रीय  सांस्कृतिक संघटनेकडून त्यांना 'अखिल भारतीय शहनाई चक्रवर्ती' हा किताब सन्मानाने बहाल करण्यात आला. १९५६ मध्ये

‘संगीत नाटक अकादमी’ तर्फे सन्मान लाभला. १९६१ मध्ये भारत सरकारकडून त्यांना ‘पद्मश्री’, १९६८ मध्ये ‘पद्मभूषण’ आणि १९८० मध्ये ‘पद्मविभूषण’ या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. त्यांना मध्यप्रदेश शासनाकडून ‘तानसेन’ पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला. ‘रॉयल नेपाळ आर्ट अकादमी’ तर्फेही त्यांचा सन्मान करण्यात आला. २००१ साली भारत सरकारने आपल्या ‘लतादीदी’ आणि ‘बिस्मिल्लाजीं’ यांना संगीताक्षेत्रातील अद्‌वितीय कामगिरीसाठी ‘भारतरत्न’ या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले आहे. (भारत सरकारने त्यांच्या गौरवार्थ ‘पोस्टल स्टॅम्प’ सुद्धा प्रकाशित केला आहे! तसेच दि. ७ एप्रिल, २०१३ रोजी तेलंगणा, हैद्राबाद येथील महत्त्वाच्या अशा मार्गाला ‘उस्तादजींचं’ नाव देऊन त्यांचा सन्मान केला आहे. या सोहळयाला त्यांचे जिवाभावाचे असलेले पं. हरिप्रसाद चौरसिया आणि के. विश्वनाथ साहेब आवर्जून उपस्थित होते.) त्यांना ‘बनारस हिंदू युनिव्हर्सिटी’ (बनारस) तसेच ‘विश्वभारती युनिव्हर्सिटी - शांतिनिकेतन’ यांच्यातर्फे मानद् डॉक्टरेट पदवी देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आलेला आहे. व्वा!! आपले ‘बिस्मिल्ला खाँसाहेब’ आणि ‘उस्ताद विलायत खाँसाहेब’ यांच्यात अत्यंत जिव्हाळयाचं, अगदी जन्मोजन्मीचं असावं असं नातं होतं. उस्ताद विलायत खाँसाहेब यांची मुलगी आणि प्रसिद्ध गायिका या त्यांच्या नातेसंबंधांविषयी बरंच काही बोलल्या आहेत. उस्ताद विलायत खाँसाहेब आपलेपणाने म्हणायचे.. ‘माझा आणि बिस्मिल्ला खाँ’ यांचा आत्मा जणू एकच आहे. त्यांची अनेक ‘जुगलबंदी’चे ‘अल्बमस्’ ही काही उदाहरणं पुरेत!




'उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेब' यांनी आपल्या 'शहनाईला' भारतीय शास्त्रीय संगीतात सन्मानाचं स्थान मिळवून देत ते लोकप्रिय करण्याचं अनुपमेय काम केलं आहे. त्यांनी नवीन रागांची निर्मिती तर केलीच तसंच नवीन 'चीजा' सर्वसामान्यापर्यंत पोहोचवल्या हे खचितच प्रशंसनीय आहे. त्यांचा वारसा पुढे नेणारे अनेक विद्यार्थी, त्यांनी आपले 'शिष्य' म्हणून स्वीकारले नसले तरी, अनेक दिग्गज वादक त्यांना 'गुरुस्थानी' मानतात. त्यांनी आपल्या बुद्धिकौशल्याने संगीतावर असा सार्वकालिक प्रभाव पाडला की ते अविस्मरणीय ठरले.

'सनई-शहनाई' या लोकवाद्याला देवळाच्या पायरीवरून सन्मानानं मंदिराच्या गर्भागारात नेण्याचा चमत्कार या सरस्वतीच्या उपासकाने केला. नुसत्या श्रवणभक्तीने अभ्यासपूर्ण रियाजाच्या बळावर त्यांनी जे शिखर पादाक्रांत केलं आहे ते काबीज करणं पुढची अनेक दशकं तरी अशक्यप्राय आहे. 'सनई' या 'वाजणाऱ्या' वाद्याला 'गायला' लावून अवघ्या जगाला डोलायला लावणारे

‘बिस्मिल्लाजी’ खरंच ग्रेट! जागतिक स्तरावर धर्मनिरपेक्ष भारताची ओळख म्हणून ‘बिस्मिल्ला खाँसाहेब’ हे अभिमानाने वावरले. जगाच्या कानाकोपऱ्यात त्यांच्या सनईचे सूर पोहोचले आहेत, यातच सर्वकाही आलं. दि. ७ मार्च, २००६ चा तो मनहुस दिवस! ‘बनारस’ रेल्वे स्थानक आणि काही मिनिटातच ‘संकट मोचन मंदिरात’ झालेला तो भीषण ‘बॉम्ब स्फोट’! अनेक मृत्यू आणि जखमी असं ते तांडव! तेव्हा ‘बिस्मिल्ला खाँसाहेबांनी’ गंगेच्या काठावर देशभरात शांतता नांदावी यासाठी आपली ‘शहनाई’ आर्ततेनं वाजवली होती! त्यांना लोकांना वेगळं असं कोणतंच आवाहन करावं लागलं नाही. त्यांची शहनाई एकच गाणं गात होती.. ‘रघुपती राघव राजाराम, पतितपावन सीताराम..’!

सगळं काही आलबेल असताना मे, २००६ मध्ये त्यांची तब्येत अचानक काहीशी बिघडली होती. नव्वदीत पदार्पण केलेले बिस्मिल्लाजी केवळ प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर आठवडयाभरातच बरे झाले. त्यांचं एक स्वप्न होतं, जणू ते त्या स्वप्नापूर्तीसाठीच जगत होते. देशाच्या स्वातंत्र्यदिनी ‘लाल किल्ल्यावर’ तर सतत शहनाईवादन केले होतेच. परंतु त्यांनी येत्या ९ ऑगस्ट (ऑगस्ट क्रांती दिन) रोजी ‘इंडिया गेटवर’ स्वातंत्र्य सैनिकांच्या समर्पणाला कुर्निसात म्हणून, शहनाई वाजवण्याची आपली इच्छा मनोमन व्यक्त केली होती. तुम्हाला माहितच आहे की, दिल्लीचं ‘इंडिया गेट’ (निर्मिती : इ.स. १९३१) हे भारताचं एक महत्त्वाचं राष्ट्रीय स्मारक आहे! भारतीय सैन्यदलातील शहीद सैनिकांच्या स्मरणार्थ ‘अमर जवान ज्योती’ ही ‘इंडिया गेट’ इथे आहे. बिस्मिल्लाजींच्या संकल्पनेनुसार सगळी तयारी

झाली होती. परंतु नियतीच्या मनात मात्र तसं नव्हतं. ६ ऑगस्ट, २००६ रोजी त्यांनी, आपल्याला बरं वाटत नसल्याचं निकटवर्तीयांना सांगितलं. प्रकृती नाजुक होती! आता 'इंडिया गेटवरचा' तो नियोजित कार्यक्रम काही होऊ शकणार नाहीय, हे स्पष्ट झालं. औषधोपचार करून त्यानंतर त्यांना घरीच आराम करण्याचं सांगण्यात आलं. १७ ऑगस्ट उगवला! 'बिस्मिल्लाजींची' तब्येत आणखीनच बिघडू लागल्याने शेवटी त्यांना बनारस मधल्याच 'हेरिटेज हॉस्पिटल' मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं. पण हाय! २१ ऑगस्ट, २००६ रोजी प्रकृतीत अचानक आणखी बिघाड होऊन, हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने (कार्डिॲक-अरेस्ट) त्यांचं आकस्मिक निधन झालं. सर्वत्र शोककळा पसरली! त्यांच्या निधनानंतर, शोक व्यक्त करण्यासाठी भारत सरकारने दुसऱ्या दिवशी 'राष्ट्रीय दुखवटा दिवस' पाळला. २१ तोफांची सलामी देत शासकिय इतमामात, त्यांची प्राणप्रिय शहनाई व अचेतन शरीर, बनारसमधील 'फतेहमान' दफनभूमीत, एका भव्य कडुनिंबाच्या झाडाखाली एकत्र पुरण्यात आल्या. एक प्रदीर्घ सुरेल पर्व संपलं.

आपल्या कुटुंबातील एकूण सत्तर व्यक्ती आणि 'गुरुकुल' पद्धतीने 'शागीर्दी' करणारे 'शिष्य' यांचा कुटुंबप्रमुख आज आपल्यात नाहीय! पण त्यांची 'चिरंजीव' शहनाई आपल्याला आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत साथसंगत करणार आहे. आकाशवाणीवरून पहाटे जाग आणण्याचं काम करणारी, तसेच आपल्या प्रत्येक उत्सव, शुभकार्य, मंगल सोहळे आणि विवाह समारंभात आवर्जून वाजणारी, आणि स्वतःच्या साक्षीनं 'शुभं भवतु' असा निर्व्याज व मनःपूर्वक आशीर्वाद देणारी

'शहनाई' आपल्याकडे आहे. पण ती 'ध्वनिमुद्रित' स्वरूपात! परंतु त्यात यानंतर आपल्या 'उस्तादजींचा' श्वास नसणार, ही खंत खचितच छळणारी होती/आहे!

**© - डॉ. अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार, लेखक व संगीत संयोजक)**
**anantpavaskar@gmail.com (9820022417)**

♥



♥

# ‘उस्ताद बिस्मिल्ला खाँसाहेब’ यांचे ‘अल्बम्स’



















Shehnai
[KAJRI & CHAITI]
USTAD BISMILLAH KHAN
Bharatratna
Ustad Bismillah Khan


Different
Strokes
Bharatratna
Ustad Bismillah Khan


IMMORTAL SERIES
SHEHNAI SAMRAT
USTAD BISMILLAH KHAN
AUDIO JUKEBOX


RAGA SHUDDA
SARANG
Ustad Bismillah Khan


Shaan-E-
Shehnai
USTAD
BISMILLAH KHAN
Playlist


Shadi ki Shehnai
MADHMAS
Bharatratna
Ustad Bismillah Khan


Raag
MADHUVANTI
USTAD BISMILLAH KHAN


Ustad Bismillah Khan
The
Soul of
Shehnai


Raga
Bairagi
USTAD BISMILLAH KHAN
THE LAST
WORD
IN SHEHNAI


RAGHUPATI
RAGHAV
RAJA RAM
USTAD BISMILLAH KHAN
Dhun for collection


Raga Brindabani
Sarang
Ustad Bismillah Khan


KANYADAAN
[HAMSA NARAYAN]
Ustad Bismillah Khan


RAGA
SOHINI (TEEN TAL)
Ustad Bismillah Khan


TODI
USTAD BISMILLAH KHAN


सुप्रभात
Ustad
Bismillah Khan


Dhun In
Raga Mishra
Pilu
Ustad Bismillah Khan
THE LAST
WORD
IN SHEHNAI


Jugalbandi
Ustad Bismillah Khan
ALL IN ONE 'PLAYLIST'


Kalavati
Ustad Bismillah Khan


USTAD BISMILLAH KHAN
The Shehnai Maestro's Musical Legacy


Vaishnava Janato
USTAD BISMILLAH KHAN
PROF. V.G.JOG


The Magic of Shehnai
Ustad Bismillah Khan


Shehnai Raga
Ustad Bismillah Khan


HITS OF
USTAD BISMILLAH KHAN


GREAT MAESTROS
RAAG : LALIT-ALAAP & GAT
RAAG : PURIYA DHANASHRI
RAAG : DURGA
RAAG : BHARAVI THUMRI
RAAG : MALHAR
RAAG : MIYAN KI TODI
USTAD
BISMILLAH KHAN


PLAYLIST
RAAG BHAIRAV
Singer
Ustad Bismillah Khan


Dhun
Singer
Ustad Bismillah Khan


BISMILLAH KHAN
AMJAD ALI KHAN
VOLUME -1
MUSIC TODAY
RU BA RU
A UNIQUE CONFLUENCE OF
SHEHNAI & SAROD


VENUS
Festive Shehnai
Bharatratna
Ustad Bismillah Khan


Divine Songs of
USTAD
BISMILLAH KHAN


AKASHVANI SANGEET
Bharat Ratna
Ustad Bismillah Khan
Raag- Bihag
Subscribe, follow & like our page


Ghazal
Ustad Bismillah Khan


Immortal Series
RAAG : TODI TEEN TAAL
RAAG : BHIMPALASI
RACHNA PURAB ANG
RAAG : BRINDABANI SARANG
KAJRI DADRA TAAL
RAAG : SHYAM KALYAN
KAJRI : KAHARVA TAAL
USTAD
BISMILLAH KHAN


saregama
USTAD BISMILLAH KHAN'S
BEST CLASSICAL
MELODIES


Virasat-E-Bismillah
AN ODE TO
Ustad
Bismillah
Khan


Ustad
Bismillah
Khan
The Great


saregama
MASTERPIECES
OF
USTAD BISMILLAH KHAN


Ustad Vilayat Khan
&
Ustad Bismillah Khan
Kajri & Hori
Subscribe, follow & like our pages


THE LAST
WORD
SHEHNAI
MUSIC TODAY
USTAD BISMILLAH KHAN


Bharat Ratna
Ustad Bismillah Khan
Shehnai
(From Radio Autobiography)



Whatsapp: 9987737237 esahity@gmail.com

## 'डॉ.अनंत पावसकर' यांची प्रकाशित झालेली ही काही'ई-बुक्स'..

## फक्त 'क्लिक' करा..

**For all 'E-Sahitya' E-Books.. Visit/Log on**

**https://www.esahity.com**



















ebook
अलौकिक
भारतरत्न स्वरसम्राज्ञी लतादीदी
लेखक - अनंत पावसकर


ebook
मेरी कहानी भूलनेवाले..
संगीतसूर्य
नौशादजी
लेखक : अनंत पावसकर


ebook
आठवणी
'रेडिओ'च्या
लेखक - अनंत पावसकर


ebook
'सुर के बिना जीवन सूना..'
- गायक/संगीतकार : मन्ना डे
लेखक - अनंत पावसकर


ebook
'जय हो !..'
- संगीतकार : ए. आर. रहेमान
लेखक - अनंत पावसकर


ebook
'स्वरलक्ष्मी'.. 'भारतरत्न'
- एम्. एस्. सुब्बुलक्ष्मी
लेखक - अनंत पावसकर


ebook
वाह उस्ताद !..
- तबलानवाज़ 'उस्ताद अल्ला रख्खाजी' (अब्बाजी)
लेखक - अनंत पावसकर


ebook
'द किंग ऑफ मेलडी' -
ओ. पी. नय्यर
लेखक - अनंत पावसकर


'स्वरभास्कर'
ebook
- पं. भीमसेनजी जोशी
लेखक - अनंत पावसकर